दिनांक २० ते २९ मार्च २०१८ या कालावधीत रांची, झारखंड येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा बुध्दीबळ स्पर्धा (२०१७-१८) मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१८/प्र.क्र.२७/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:-१५ मार्च, २०१८

वाचा:- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ क्रमांक-५९/०२/२०१७-१८ /सीसीएससीएसबी यांचे दिनांक २२/०२/२०१८ चे पत्र.
(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/बुध्दीबळ/२०१७-१८, दि. ०८.०३.२०१८.
(३) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग,मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री/ अभानासे/१७-१८/का-४/६३७, दि.१३/०३/२०१८.

: शासन निर्णय :

दिनांक २० ते २९ मार्च, २०१८ या कालावधीत रांची, झारखंड येथे आयोजित करण्यात आलेल्या **अखिल भारतीय नागरी सेवा बुध्दीबळ स्पर्धा २०१७-१८** मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता सचिवालय जिमखाना, मुंबई येथे दिनांक ६ व ७ मार्च, २०१८ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेल्या राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे रु. २०,०२०/-(रुपये वीस हजार वीस फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येतआहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किटबॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक/ व्यवस्थापक यांना दिनांक १५ मार्च, २०१८ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे या खेळाडूंना दिनांक १६ व १७ मार्च, २०१८ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी सचिवालय जिमखान्यात उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच त्यानंतर खेळाडूंनी दिनांक २० ते २९ मार्च, २०१८ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९,

दिनांक११ मे,१९८९ वक्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवासभत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या/ कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी/ कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९,दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबईबाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास/ दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक - एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८,दिनांक२७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी. या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी "२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षितलेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र"ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१६३९३१७३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:41:04 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे

३. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखावअनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय,मुंबई.
९. मानद महासचिव,सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११.निवड नस्ती (क्रीयुसे-२).

<u>विवरणपत्र “अ”</u>

दिनांक २० ते २९ मार्च, २०१८ या कालावधीत रांची, झारखंड येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बुध्दीबळ स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बुध्दीबळ संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	फुलओव्हर	किटबॅग	विभाग / कार्यालय
१	विजयकुमार झंवर, सहा.अभि.-२	होय	होय	संकल्प चित्रे विभाग, सा.बां.१, दरवाजे मंडळ, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, दिंडोरी रोड, नाशिक.
२	भूषण जनबंधू सहा. अभि. श्रेणी-२	होय	होय	विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ.
३	दिलीप भगत सहायक संशोधन अधिकारी	होय	होय	दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट मुंबई-४०००२३.
४	संदीप माने, वरीष्ठ लिपिक	होय	होय	कार्यकारी अभियंता,ताकारी यांत्रिकी व विद्युत विभाग, सांगली.
५	जितेंद्र चांदोरकर, क.प्र.स.	नाही	नाही	न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, कालिना, सांताक्रुझ, मुंबई- ४०० ०९८.
६	प्रमोद कल्याणी मैलारी, लिपिक टंकलेखक	होय	होय	कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर.
७	राजेश विभूते लिपिक टंकलेखक (व्यवस्थापक)	होय	होय	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:41:53 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र "ब"

दिनांक २० ते २९ मार्च, २०१८ या कालावधीत रांची, झारखंड येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बुध्दीबळ स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बुध्दीबळ संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	तपशील	रुपये
(अ)	**(निवड चाचणीपूवी झालेला खर्च)**	६००
(ब)	**निवड चाचणी**	
१	निवड चाचणीस उपस्थित राहिलेल्या असोसिएशनच्या प्रतिनिधींचे मानधन.	३,०००
२	बुध्दीबळ निवड चाचणीसाठी १६ स्टॉप वॉच बुध्दीबळ असोसिएशन, मुंबई यांच्याकडून भाड्याने आणले (१६ स्टॉप वॉच रु.६०/-x दोन दिवस = रु. १९२०/-)	१,९२०
३	निवड चाचणीस उपस्थित अधिकारी, निमंत्रक, स्वयंसेवक, पंच व प्रतिनिधी यांच्या अल्पोपहार व चहापाणी यावरील खर्च.	२,५००
(क)	**प्रशिक्षण शिबीर**	
१	दिनांक १६ व १७ मार्च, २०१८ या २ (दोन दिवस) कालावधीमधील प्रशिक्षण शिबीरासाठी प्रशिक्षकांचे मानधन, प्रशिक्षक व खेळाडू यांच्याकरिता अल्पोपहार इत्यादीवरील होणारा खर्च.	२,५००
(ड)	**साहित्य खरेदीसाठी होणारा खर्च.**	
१	७ टी-शर्ट प्रत्येकी रु. ५००/- प्रमाणे.	३,५००
२	६ फुलओव्हर रु. ५००/- प्रमाणे.	३,०००
३	४ बुध्दीबळाचे पट व सोंगट्या प्रत्येकी रु. ५००/- प्रमाणे.	२,०००
४	प्रथमोपचार / संकीर्ण खर्च	१,०००
	एकूण खर्च :- (रु. वीस हजार वीस फक्त)	**२०,०२०**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:42:56 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - क

दिनांक २० ते २९ मार्च, २०१८ या कालावधीत रांची, झारखंड येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बुध्दीबळ स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या बुध्दीबळ संघाची निवड करण्यासाठी दि. ६ व ७ मार्च, २०१८ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	विभाग/ कार्यालय
१	सुरेश चं. चव्हाण, अप्पर प्रायमरी टिचर	पंचायत समिती, मेहकर, जिल्हा बुलढाणा.
२	संतोष शामसुंदर प्रभू, कनिष्ठ अकौंटन्ट	अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा (पू) मुंबई.
३	प्रकाश मो. बोरकर, सहाय्यक सुतार	सर ज.जी. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
४	भैय्यालाल ला. परदेशी, लिपिक टंकलेखक	लघुवाद न्यायालय, धोबीतलाव, मुंबई.
५	मंदार म. पाटील, स्टेनोग्राफर	अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा (पू) मुंबई.
६	रविकांत घ. सतदेवे, कनिष्ठ लिपिक	पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई, डी.एन. रोड, मुंबई
७	सुनिल मधुसुदन उत्तरकर, कनिष्ठ प्रयोगशाळा सहाय्यक	न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय,कालिना, सांताक्रुझ, मुंबई
८	जितेंद्र द. चांदोरकर, क.प्र.स.	न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय,कालिना, सांताक्रुझ, मुंबई- ४०० ०९८.
९	राहूल शहाणे, व.प्र. स.	न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय,कालिना, सांताक्रुझ, मुंबई- ४०० ०९८.
१०	श्रीनिवास य. देशमाने, लिपिक टंकलेखक	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११	भिकाजी वा.नागरे, विक्रीकर अधिकारी	विक्रीकर सहआयुक्त, नोडल-५, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
१२	प्रदिप जा. यादव, शिधावाटप निरिक्षक	नियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, रॉयल इन्शुरन्स इमारत, चर्चगेट, मुंबई.
१३	शामसुंदर ह. काळे, कनिष्ठ अभियंता	कार्यकारी अभियंता, लघुसिंचन जलसंधारण विभाग, औरंगाबाद.
१४	संदीप एम. माने, वरिष्ठ लिपिक	कार्यकारी अभियंता,ताकारी यांत्रिकी व विद्युत विभाग, सांगली.
१५	हेमंत उ. नाईक, भांडारपाल	कार्यकारी अभियंता, तापी खोरे सर्व्हेक्षण व अवे. विभागीय पथक, जळगांव.
१६	दिलीप वि. भगत, सहायक संशोधन अधिकारी	दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २७, बरजोरजी भरुचा मार्ग, फोर्ट मुंबई-४०००२३.
१७	विजयकुमार श्या. झंवर, उ.वि. अभियंता	कार्यकार अभियंता, आंबोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर.

१८	मिलिंद गं. पवार विक्रिकर निरिक्षक	राज्यकर सह आयुक्त, वस्तु व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई.
१९	श्रीकांत शरद दराडे, सहायक संशोधन अधिकारी	दर्शनिका विभाग, २७ ब.भरुचा मार्ग, फोर्ट, मुंबई-२३
२०	भूषण दुलिचंद जनबंधु सहा. अभि. श्रेणी-२	विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ.
२१	वसंता ना. हेडाऊ, लिपिक टंकलेखक	आस्थापना अधिकारी, नोडल-५ व ६, मुंबई, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई.
२२	सौ. वर्षा शै. पेंडे, वरिष्ठ लिपिक	कार्यकारी अभियंता, ताकारी यांत्रिकी विद्युत विभाग, सांगली.
२३	गणेश आ. जाधव, लिपिक टंकलेखक	अन्न, नागरी पुरवठा व ग्रा.सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४	विठ्ठल भास्कर, कक्ष अधिकारी	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५	राजेश विभूते, लिपिक टंकलेखक	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२६	प्रशांत ना. कानगुडे, लिपिक टंकलेखक	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७	विनोद सो. खिल्लारी, राज्यकर निरिक्षक	वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई.
२८	चंद्रशेखर वि. कोळी, राज्यकर निरिक्षक	वस्तू व सेवा कर भवन, माझगांव, मुंबई.
२९	श्यामसुंदर लि. पाटील, सह सचिव	महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०	प्रमोद कल्याणी मैलारी, लिपिक टंकलेखक	कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र.२, सोलापूर.
३१	सुनिल आगरकर, कक्ष अधिकारी	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२	सुहास चव्हाण, अवर सचिव	विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

Rajendra
Shankarrao
Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:44:13 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन